महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : eooandm@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/३०६३८
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३
दिनांक : ०५/१०/२०१०

# परिपत्रक

विषय : **वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर** या रुग्णालयाच्या दरसुचीला मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.९७ दिनांक २८.०२.२००७

.....

महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना ह्दयरोगावरील उपचार व शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी सा.आ.क्र.२० (क) दिनांक १७.०६.१९६३ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.९७ दि.२८.०२.२००७ अन्वये वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर या रुग्णालयास महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर समाविष्ट करण्यात आले होते. तथापि, सदर रूग्णालयाकडून सादर करण्यात आलेले दर हे दिनांक २८.०२.२००७ ते दिनांक २७.०२.२०१० पर्यंतच अंमलात होते. सदर रुग्णालयाने सादर केलेल्या दरांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता सक्षम अधिकाऱ्यांनी. वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर या रुग्णालयाने सादर केलेल्या नवीन दरसुचिला तीन वर्षांकरिता म्हणजेच दिनांक २८.०२.२०१० ते २७.०२.२०१३ या कालावधीकरिता मान्यता दिली आहे.

३. सदर रुग्णालयामध्ये उपचार/शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना नियमानुसार दरसुचीच्या मर्यादेच्या अधीन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. प्रशासकीय परिपत्रक क्र.९७ दि.२८.०२.२००७ मधील इतर अटी व तरतुदी अबाधित राहतील.

५. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**महाव्यवस्थापक (क)**

प्रति,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालयापर्यंत.

*D:\O&M\Hospitals\Circular-Vochart Hospistal, Nagpur.doc*
*05/10/2010*